जा.क्रं. उमाशि-१/पुवि/इ.११वी कें.प्रवेश/२०१३/१६०४८/५५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :- ५/६/२०१३

6 JUN 2013

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक

----------------------------------

----------------------------------

विषय :- इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१३-१४.
मार्गदर्शक सूचना

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रं. एफईडी/१०८४/(२५६८)साशि-२/दि. ६/३/१९८६
२. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.४/६/१९९७
३. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.२६/६/१९९७
४. शासन निर्णय क्रं.एचएससी/२०१०/(२५/१०)/उमाशि-२/दि.२५/२/२०१०
५. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.२५/३/२०१०
६. शासन निर्णय क्रं.एचएससी/१७०७/(२२२/०७)/उमाशि-१/दि.२५/३/२०१०

पुणे शहर व पिंपरी परिसरातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील / उच्च माध्यमिक विदयालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश दरवर्षी प्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दतीने सन २०१३-१४ मध्ये केले जाणार आहेत हे आपणास विदितच आहे.

सदर केंद्रीय प्रवेश पध्दतीचा अवलंब करण्यासाठी खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे गांभीर्याने अवलोकन करुन प्रवेशाबाबतची कार्यवाही आपल्या मार्गदर्शनाखाली करण्यात यावी.

१. केंद्रीय प्रवेश पध्दतीमध्ये संगणक एजन्सी कडून प्राप्त होणा-या यादीप्रमाणे प्रवेश देण्यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालय-स्तरावरील प्रवेश अल्पसंख्यांक व इनहाऊस कोटयातील प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांना एसएससीचे गुणपत्रक मिळाल्यानंतर पहिल्या ४ दिवसात (रविवार धरुन) पूर्ण करण्यात यावी.

२. अल्पसंख्यांक संस्थांनी ५० % प्रवेश संबंधीत अल्पसंख्यांक विदयार्थी यांच्या प्रवेश अर्जाद्वारे गुणवत्तेनुसार करावेत.

३. इनहाऊस कोटयामधील २० % प्रवेश माध्यमिक शाळेच्या आवारात उच्च माध्यमिक अथवा महाविद्यालयास जोडून असलेले कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर प्रवेश करावेत. सदरचे प्रवेश गुणवत्तेनुसारच करावेत.

४. अल्पसंख्यांक राखीव जागा किंवा इनहाऊस कोटयामधुन ज्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. त्यांनी केंद्रीय प्रवेश पध्दतीने आवेदन पत्र भरण्याची आवश्यकता नाही.

५. निर्धारीत केलेल्या अल्पसंख्यांक राखीव जागा ५० % आणि इनहाऊस कोटयातील २० % जागा या संदर्भात ४ दिवसात जेवढे प्रवेश झाले आहेत त्याची तपशीलवार माहिती ४ थ्या दिवशी संध्याकाळी ६.०० वा पुढील नमुन्यात इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती मुख्य केंद्र आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेराड, पुणे यांचेकडे देण्याची कार्यवाही करावी.

## प्रपत्र 'अ'

### ५० % अल्पसंख्यांक कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशाचा तपशील

शाखा : माध्यम :

| अ.क्रं. | विदयार्थ्याचे नांव | इ. १० वी बैठक क्रमांक | मिळालेले एकुण गुण | शेकडा गुण | केंद्रीय प्रवेश समितीचा अर्ज भरला असल्यास त्याचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| उपरोक्त यादी गुणवत्तेप्रमाणे असावी. | | | | | |

## प्रपत्र 'ब'

### २० % इनहाऊस कोटयातील प्रवेशाचा तपशील

शाखा : माध्यम :

| अ.क्रं. | विदयार्थ्याचे नांव | इ. १० वी बैठक क्रमांक | मिळालेले एकुण गुण | शेकडा गुण | केंद्रीय प्रवेश समितीचा अर्ज भरला असल्यास त्याचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| उपरोक्त यादी गुणवत्तेप्रमाणे असावी. | | | | | |

### प्रपत्र 'अ' व 'ब' चा संकलन तक्ता

| अ. क्रं. | तपशील | विज्ञान | | कला | | वाणिज्य | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश |
| १ | अल्पसंख्यांक प्रवेश ५० % | | | | | | | | |
| २ | इनहाऊस कोटयातील प्रवेश २० % | | | | | | | | |

६. दिनांक १३/६/१९८९ च्या शासन निर्णयानुसार एकूण जागांच्या ५ जागा हया संबंधित उच्च माध्यमिक वर्गाच्या व्यवस्थापनाने गुणवत्तेनसार परस्पर भरण्यात यावेत. या जागांवर प्रवेश दिलेल्या विदयार्थ्यांना केंद्रीय प्रवेश समितीचे आवेदन पत्र भरण्याची आवश्यकता नाही.

**७. अल्पसंख्यांक / इनहाऊस कोटयातील प्रवेशाची यादी व तद्नुषंगिक माहिती दिलेल्या कालावधीत मुख्य केंद्रास सादर न केल्यास त्या सर्व जागा केंद्रीय प्रवेश समितीकडून भरण्यात येतील. त्यानंतर त्याबाबतची कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही.**

८. अल्पसंख्यांक कोटा (५० %) / इनहाऊस (२० % ) कोटयातील प्रवेशाची यादी दर्शनी भागात लावावी आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत उपलब्ध करावी. व सदरची माहिती संगणकावर संग्रहित करुन ठेवावी

९. अल्पसंख्यांक कोटा (५० %) / इनहाऊस (२० % ) कोटयातील प्रवेशाची यादी माहिती अधिकारात मागितल्यास संबंधितांस ती उपलब्ध करुन दयावी.

१०. केंद्रीय प्रवेश समितीच्या नियमानुसार संगणक एजन्सीकडून गुणवत्ता यादया / वेळापत्रक दिले जाईल त्याप्रमाणे प्रवेशाची कार्यवाही करावी.

११. गुणवत्ता यादी प्राप्त झाल्यानंतर ती दर्शनी भागात विदयार्थ्यांना दिसेल अशा ठिकाणी लावावी.

१२. गुणवत्ता यादीतील प्रवेश झाल्यानंतर व शिल्लक राहिलेल्या जागांसाठी प्रतिक्षा यादी एक व प्रतिक्षा यादी दोन मधील यादीप्रमाणे प्रवेश प्रक्रिया क्रमाने कराव्यात.

१३. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पारदर्शक राहील याची दक्षता घ्यावी.

१४. संगणक एजन्सीकडून प्राप्त झालेल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश करताना मूळ कागदपत्रे तपासून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. गुणवत्ता यादीत त्रृटी आढळल्यास त्या मूख्य केंद्राकडे समक्ष सादर करावी. त्याचप्रमाणे त्याबाबत श्रीमती कौल पर्यवेक्षक, आबासाहेब गरवारे महाविदयालय यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क करावा. यांचा भ्रमणध्वनी क्रमांक **9850812589** आहे.

१५. प्रवेश झालेला तपशील प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर खालील तक्त्यात देण्यात याव्यात.

**शाखा :** **माध्यम :**

| अ. क्रं. | आरक्षण | आरक्षणप्रमाणे प्रवेश क्षमता | आरक्षणाप्रमाणे प्रवेश संख्या | आरक्षणाप्रमाणे प्रत्यक्ष झालेले प्रवेश | आरक्षणाप्रमाणे रिक्त राहिलेल्या जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जाती. | | | | |
| २ | अ. जमाती | | | | |
| ३ | वि.जाती | | | | |
| ४ | भज ब | | | | |
| ५ | भज क | | | | |
| ६ | भज ड | | | | |
| ७ | विमाप्र | | | | |
| ८ | इमाव | | | | |
| ९ | खुला | | | | |
| १० | आजी माजी सैनिक/ बदली/स्वा.सैनिक | | | | |
| ११ | कला व क्रीडा | | | | |
| १२ | अपंग | | | | |

१६. प्रवेश प्रक्रिया करताना अभ्यासू योग्य ते मनुष्यबळ यांचे नियोजन करावे. आवश्यकता भासल्यास पोलिस बंदोबस्तही ठेवावा.

१७. अंतिम प्रवेशाच्या यादया संबंधित सर्व कनिष्ठ महाविदयालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द कराव्यात.

१८. प्रवेश प्रक्रिया कालावधीमध्ये या कार्यालयाच्या (www.dydepune.com) संकेतस्थळावर ज्या सूचना / परिपत्रके प्रसिध्द केली जातील त्याचे अवलोकन प्राचार्यांनी स्वतः करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१९. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेवर प्राचार्यांचे सनियंत्रण असावे.

२०. **विज्ञान शाखेतील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे विज्ञान विषयाचे गुण किमान शेकडा ४० % असणे आवश्यक आहे.** त्यात तफावत आढळल्यास प्रवेश नाकारावा. ज्या विद्यार्थ्यांना ४० % पेक्षा कमी गुण असून त्यांना प्रवेश दिल्याचे आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी प्राचार्यांवर राहील.

२१. **प्रवेश निवड यादीतील विदयार्थ्यांना कोणत्याही शाखेत प्रवेश देताना इ. १० वी मध्ये सामान्य गणित कोड क्रमांक (७४) हा विषय घेतलेल्या विदयार्थ्यांस विज्ञान, वाणिज्य व कला शाखेत गणित हा विषय घेता येणार नाही. सदर विषय निवडण्यापूर्वी पूर्ण खात्री करुनच प्रवेश दयावा.**

२२. इयत्ता ११ वी नापास विदयार्थ्यांना केंद्रीय प्रवेश पध्दतीद्वारे प्रवेश दिले जात नाहीत अश्या विदयार्थ्यांना इ. ११ वी त मूळ शाखेत अथवा शाखा बदलून प्रवेश घेवू इच्छित असल्यास संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रवेश क्षमेतच्या मर्यादेत जागा असल्यास गुणवत्तेप्रमाणे त्यास प्रवेश दयावा.

२३. ज्या विदयार्थ्यांचे तक्रार अर्ज वैध असतील त्यांना केंद्रीय प्रवेश समिती तक्रारींबाबत पूर्ण चिकित्सा करुन योग्य ते कनिष्ठ महाविद्यालय बदलून देईल अशा विदयार्थ्यांकडे समितीमार्फत शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिका-यांचे सहीचे पत्र दिले जाईल व त्यानुसार प्रवेश देण्यात यावा. (प्रथम यादीतील गुणवत्तेचे प्रवेश संपल्यावर)

२४. निवड यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर जर त्यांना अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिक्षा यादीनुसार प्रवेश घ्यावयाचा असेल तर पहिल्या कनिष्ठ महाविद्यालयातील त्याचा प्रवेश रद्द करुन त्यास त्यांचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करावा. सदर विद्यार्थ्यांकडून **'अन्य कनिष्ठ महाविद्यालयात प्रतिक्षा यादीनुसार मला प्रवेश मिळाला असल्याने माझा आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात घेतलेला प्रवेश रद्द करावा व मूळ शाळा सोडल्याचा दाखला परत करावा यावा. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील मला मिळालेला प्रवेश मी माझ्या स्वेच्छेने रद्द करीत असून यापुढे प्रवेशासाठी पुन्हा येणार नाही व त्याबाबत तक्रार करण्याचा मला अधिकार राहणार नाही.'** असे लेखी हमीपत्र लिहून घ्यावे व त्याची मूळ प्रमाणपत्रे परत करावीत, व त्यांनी भरलेली प्रवेश फी शासकीय नियमानुसार परत करण्यात यावी. त्याबाबत त्यांना कसलीही तक्रार करण्यास वाव मिळणार नाही, व अशा प्रकारच्या तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

२५. **उशिरा प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील निवड यादीतील शेवटच्या विद्यार्थ्यांच्या गुणांच्या टक्केवारी व त्यापेक्षा अधिक गुण असल्यास अशा विद्यार्थ्यांना या कार्यालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय प्रवेश देता येईल. परंतू कट ऑफ पॉईंट पेक्षा कमी गुण असणा-या विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश मान्य होणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

२६. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शालान्त प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य बोर्डाची अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील राज्यातील

किंवा परदेशातील विद्यार्थ्यांसाठी **योग्यता प्रमाणपत्र** पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मिळाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश कायम होणार नाही. याची संबंधित विद्यार्थ्यांला प्रवेशाच्या वेळी स्पष्ट कल्पना द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

२७. योग्यता प्रमाणपत्राच्या अभावी विद्यार्थ्यांचा तात्पुरत्या स्वरुपातील प्रवेश रद्द होणे किंवा विद्यार्थी वार्षिक परीक्षेस अपात्र ठरविला जाण्याची कार्यवाही होऊ शकते, सबब संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह पुणे विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा व योग्यता प्रमाणपत्र मिळवावे ही जबाबदारी विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

२८. इ. ११ वी प्रवेशाबाबतची कार्यवाही प्राचार्यांनी वरील सूचनाप्रमाणे करणे आवश्यक असतांनाही एखाद्या विशिष्ट विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश समितीकडून अथवा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडून पत्राची अथवा चिठ्ठीची मागणी केली जाते असे पालकांकडून समजते. परंतू केंद्रीय प्रवेश समितीकडून कोणतेही पत्र अथवा चिठ्ठी देण्याची तरतूद प्रवेश पध्दतीमध्ये करण्यात आलेली नाही. तेव्हा अशा प्रकारची मागणी करु नये.

२९. प्रवेश देतांना संस्थेने/कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे विद्यार्थी /पालक व संबंधित व्यक्तींकडून कसल्याही प्रकारची देणगी व कॅपीटेशन फी घेणे सन १९८८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ नुसार दंडनीय गुन्हा आहे.याची दक्षता घ्यावी. अशा प्रकारची देणगी व कॅपीटेशन फी घेणे हा दंडनीय गुन्हा आहे याची नोंद घ्यावी.

३०. कोणत्याही परिस्थितीत प्रवेशाबाबत विदयार्थी व पालक यांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्रवेशासाठी पाठवू नये. वस्तूस्थितीप्रमाणे विदयार्थ्यांस मागदर्शन करावे.

सदरचे परिपत्रक शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

6/6/13

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे -१ तथा**
**अध्यक्ष**
**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे**

**प्रत -** **माहितीसाठी सविनय सादर**
**मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक)**
**शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १**

**प्रत -** **माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
**जिल्हा व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी**
**घोले रोड, पुणे-५**